नागपूर

महासागर
वृत्तसागर

■ गुरूवार, दि. २० फेब्रुवारी २०२५ ■

# अवमानाबद्दल भाजपानेच माफी मागावी : लोंढे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
शिवजयंतीच्या निमित्ताने राहुल गांधी यांनी केलेल्या ट्विटवर भाजपाकडून टीका होत असली, तरी त्याआधी भाजपाच्या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ट्विट पाहावे, असे काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान भाजपानेच वारंवार केला असून, त्यामुळे त्यांच्याच नेत्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अतुल लोंढे यांनी नमूद केले की, मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भाजपाच्या सरकारने उभारला, जो अवघ्या आठ महिन्यांत कोसळला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबद्दल शिवप्रेमींची माफी मागितली नाही. तसेच, अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारकाचे जलपूजन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले, मात्र अद्याप स्मारकाची एकही विट रचली नाही.

तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनीही महाराजांचा अपमान केला, तरी भाजपाच्या नेत्यांनी त्यावर मौन बाळगले. केवळ राजकीय स्वार्थासाठी शिवरायांचा वापर करणाऱ्या भाजपाचा निषेध करतो, असेही लोंढे म्हणाले. राहुल गांधी यांच्यावर सातत्याने टीका करणाऱ्या भाजपाच्या काही नेत्यांना दुसरे उद्योग नाहीत, त्यांना स्वप्नातही राहुल गांधीच दिसतात, असा टोमणाही अतुल लोंढे यांनी लगावला.

# छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा नव्या पिढीसाठी दिशादर्शक : ना. बावनकुळे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास हा सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवरायांच्या कार्याची महती लहान थोरांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा ही नव्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. ही प्रेरणा त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी ह्यजय छत्रपती शिवाजी महाराज जय भारत पदयात्राह्ल हा उत्तम आणि महत्वाकांक्षी उपक्रम आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.





हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती नागपूर महानगरपालिका आणि नागपूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने दिमाखात साजरी करण्यात आली. केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने शहरात बुधवार १९ फेब्रुवारी रोजी राजे रघुजी भोसले स्मारक सक्करदरा ते गांधी गेट महाल पर्यंत जय छत्रपती शिवाजी महाराज जय भारत पदयात्रा काढण्यात आली.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची पदयात्रेला विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी आमदार प्रवीण दटके, आमदार आशिष देशमुख, श्रीमंत राजे मुधोजी भोसले, माजी आमदार विकास कुंभारे, विभागीय आयुक्त श्रीमती माधवी खोडे, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, आदिवासी विभाग अप्पर आयुक्त रवींद्र ठाकरे, मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलिस उपायुक्त महेक स्वामी, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य समय बन्सोड, मनपा उपायुक्त श्रीमती विजया बनकर, उपायुक्त विजय देशमुख, मिलींद मेश्राम, डॉ. रंजना लाडे, परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव, सहायक आयुक्त समाजकल्याण विभाग श्रीमती सुकेशनी तेलगोटे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, मनपा क्रीडा व सांस्कृतिक अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर, एनसीसीचे कर्नल गौतम कपूर, कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण यांच्यासह मनपाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**(अधिक वृत्त पान ४ वर)**

## नागपुरात उभारणार महाराजांचा ५१ फुटी पुतळा



### २०२६ च्या शिवजयंतीला लोकार्पण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराजबाग परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा जगातील सर्वात मोठा सिंहासनारूढ पुतळा उभारला जाणार आहे. हा पुतळा ५१ फूट उंचीचा असेल. पुतळ्याची स्थापना १९ मार्च २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ. मुधोजी राजे भोसले यांनी सांगितले की स्मारकाचे काम मार्चपासून सुरू होईल. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती लोकसहभागातून हा भव्य पुतळा साकारणार आहे. १८ जून २०२३ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते स्मारकाच्या जागेचे भूमिपूजन झाले. आतापर्यंत सुमारे ५० लाख रुपये देणगी जमा झाली आहे.

मूर्तिकार सोनल कोहाड यांच्याकडे पुतळ्याची निर्मिती सोपवण्यात आली आहे. पुतळ्याच्या चबुतऱ्याची लांबी २० फूट, रुंदी १५ फूट आणि उंची ९ फूट असेल. सिंहासनारूढ पुतळ्याची उंची ३२ फूट असून त्यावरील छत्र ७ फूट उंच असेल. ब्रॉन्झ धातूपासून बनवला जाणारा हा पुतळा १०,००० किलोग्रॅम वजनाचा असेल.

स्मारक समिती विद्यार्थी, शिक्षक, इतिहास संशोधक आणि अभ्यासकांसाठी प्रगत शिक्षण केंद्र उभारणार आहे. या केंद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन आणि कार्यावर संशोधन करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. पुतळा कोल्हापुरात सहा भागांत तयार होऊन नागपुरात त्याची जोडणी केली जाणार आहे.

# माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डींची घरवापसी



## निलंबन रद्द, भाजपामध्ये पुन्हा प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १९ :**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,भाजपा प्रदेशाध्यक्ष तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपचे माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी यांच्यासह १२ नेत्यांनी पुन्हा भाजपात प्रवेश केला. पक्षाकडून त्यांचे लिंबन रद्द करण्यात आले आहे.

मनसर येथील भारती सेलिब्रेशन लॉन येथे आयोजित पक्षप्रवेश कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, माजी अध्यक्ष डॉ. राजीव पोतदार, महामंत्री उदयसिंह यादव, महामंत्री आदर्श पटले, रिंकेश चौरे, माजी जि. प.सदस्य सतीश डोंगरे, तालुकाध्यक्ष राहुल किरपान, बंटी गुप्ता प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते .

याप्रसंगी रामटेक विधानसभा क्षेत्रातील सरपंच सुखदास मडावी (पटगोवरी), संकेत झाडे (खंडाळा), मिलिंद देशभ्रतार (नांदगाव), विनोद इनवाते (टेकाडी को.ख.), ईश्वर बसिने (चिचाळा), सुनील गजभीये (हिवरा हिवरी) आणी उबाठाचे पारशिवणी तालुकाध्यक्ष कैलास खंगार यांच्यासह २०० कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केबल व वाहन चोर हिंगणा पोलिसांच्या जाळ्यात

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १९ :**
चोरी केलेल्या केबल मधून काढलेले तांबे विकायला नेत असतांना हिंगणा पोलीस पथकाने एका अट्टल चोराला अटक केली. जगदीश हेमू निषाद (४३) वर्ष रा. राजीव नगर, झोपडपट्टी हिंगणा रोड, नागपूर, असे आरोपीचे नाव आहे.

कान्होलिबारा येथील एका कारखान्यातील ईलेक्ट्रीक केबल चोरून त्यातील तांब्याची तार विकण्याच्या तयारीत तो खापरी परिसरात ग्राहक शोधत असतांना हिंगणा पोलिसांना दिसला . त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.



त्याच्याकडून चोरलेली मोटरसायकल व २५ किलो तार असा ३५००० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कार्यवाही हिंगण्याचे ठाणेदार जितेंद्र बोबडे, पीएसआय संतोष राठोड यांचे मार्गदर्शनात हवालदार नागेश्वर दासरवार, नंदकिशोर रडखे, शिपाई अनिल झाडे, संजीव तायडे यांनी केली.

# जीएसटीच्या कलम १२८अ मुळे करदात्यांना दिलासा

## व्हीएमएच्या सत्रात सीए चिन्मय जोशी यांनी 'जीएसटी माफी योजना' सांगितली समजावून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
जीएसटीचा कलम १२८अ मुळे करदात्यांना अनुपालन सुनिश्चित करताना दिलासा मिळतो, असे जोध जोशी अँड कंपनीचे भागीदार सीए चिन्मय जोशी म्हणाले. ते सिव्हिल लाईन्स येथील चिटणवीस सेंटर येथे आयोजित विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनच्या साप्ताहिक सत्रात 'जीएसटी माफीः तुमच्या नवीन सुरुवातीचे प्रवेशद्वार' या विषयावर बोलत होते. या सत्राचा उद्देश जीएसटी माफी योजनेबद्दल माहिती प्रदान करणे, व्यवसाय मालकांना आणि उद्योजकांना त्याचे महत्त्व समजावून सांगणे हा होता.




कलम १२८अ हा केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (सीजीएसटी) कायदा, २०१७ मध्ये वित्त कायदा, २०२४ द्वारे लागू करण्यात आला आणि १ नोव्हेंबर २०२४ रोजी तो लागू झाला. २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षांसाठी कलम ७३ अंतर्गत वाढवलेल्या कर मागण्यांसाठी व्याज, दंड किंवा दोन्ही माफ करून काही अटींवर दिलासा मिळतो.

ही योजना करदात्यांवर, विशेषतः मागील कर थकबाकी असलेल्या व्यवसायांवर, जीएसटी कायद्यांचे पालन सुनिश्चित करताना, भार कमी करण्यासाठी तयार केली आहे, असे सीए चिन्मय जोशी यांनी सांगितले.

माफी योजना लक्षणीय सवलत देते असे सांगतानाच ती फसवणुकीच्या प्रकरणांना लागू होत नाही असे ते म्हणाले.

कलम ७४ अंतर्गत उचललेल्या कर मागण्या, ज्यामध्ये फसवणूक, चुकीचे सादरीकरण किंवा तथ्ये दडपण्याचा समावेश आहे, त्या सवलतीसाठी पात्र नाहीत असे जोशी यांनी नमूद केले. सत्राचे संचालन सीए प्रवीण कुमार लिमजा यांनी केले, तर निकेत अग्रवाल सत्र प्रभारी होते.

# आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी





■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहिली.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे अतुलनीय धैर्य, शौर्य आणि राष्ट्र उभारणीतील योगदानाबद्दल विचार व्यक्त केले. यावेळी वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी उदय कुमार भरत यांनी छत्रपती शिवाजी महाराज लोकल्याणकारी राजा होते, त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन देशसेवेसाठी स्वतःला समर्पित करण्यावर भर द्यावा, असे मत व्यक्त केले.

# भटके विमुक्त परिषद आजपासून नागपुरात

> २ हजार कार्यकर्त्यांसह तंबूत राहणार अतिथी
>
> विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
नागपुरातील काटोल रोडवरील गिट्टीखदान मैदानात गुरुवार २० फेब्रुवारीपासून द्विदिवसीय भटके विमुक्त कल्याणकारी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन दुपारी ३.३० वाजता होणार आहे. विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची उपस्थिती राहणार आहे.

पुणे येथील शुभांगी तांबट या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहतील. विदभार्तून सुमारे १५०० ते २००० कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते कार्यक्रमस्थळी उभारलेल्या तंबूत मुक्काम करणार आहेत. शिबिरात भटक्या लोककलांचे प्रदर्शन, शासकीय योजनांची माहिती, स्वयंरोजगार मार्गदर्शन, रोगनिदान शिबिर आणि जात प्रमाणपत्र वाटप असे विविध कार्यक्रम होणार आहेत. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे.

परिषद शिक्षण, महिला सशक्तीकरण, स्वावलंबन, आरोग्य, सन्मान आणि समस्या निवारण या सहा प्रमुख क्षेत्रांवर काम करते. विदर्भात नाथजोगी, बहुरूपी, बेलदार, कैकाडी, नंदीवाले, वैदू, वडार, गोसावी, गोपाळ, मांग-गारुडी यांसह अनेक भटक्या समाजाचे बांधव वास्तव्याला आहेत. त्यांच्या कल्याणासाठी भटके विमुक्त कल्याणकारी परिषद विविध उपक्रमांद्वारे कार्यरत आहे.



# सीटू तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयू) नागपूर जिल्हा तर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त खंडोबा देवस्थान, सुभाष रोड समोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला जिल्हाध्यक्ष कॉं. राजेंद्र साठे यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला कॉ. प्रीती मेश्राम, मेहरूनिसा कनोजे, अर्चना निर्मळे, शितल बागडे, रेणुका पाटील, लक्ष्मी कानेरकर, वर्षा मानवटकर, वर्षा वालदे, सुनिता थोटे, गयाबाई बावणे, कावेरी मडावी, सुंदर देवतळे, लता रामटेके ई.आशा वर्कर उपस्थित होत्या.



# विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी

महासागर प्रतिनिधी,


नागपूर, दि. ४ : केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशासाठी अभिमानाचे प्रतीक असलेले हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली आणी त्यांना मानवंदना देण्यात आली.

## वाडी भाजपा तर्फे शिवजयंती साजरी



**वाडी :** हिंदवी स्वराज्य संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्त आदर्श नगर चौकातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील शिवाजी महाराज यांच्या सिंहासनारुढ पुतळ्याचे भाजपा वाडी मंडळ व शहर यांच्या वतीने महाराजांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करुन विधिवत पूजन केले. मिठाई वाटून महाराजांचा जयजयकार केला. यावेळी भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष आनंदबाबु कदम, राजुताई भोले,नरेश चरडे, पुरुषोत्तम रागीट,सरीता यादव, आशिषु टाने,कैलाश मंथापुरवार, दिनेश कोचे, सरपंच ज्योत्सना नितनवरे ,गोविंदराव रोडे, कमल कनोजे, जितेंद्र रहांगडाले, पुरुषोत्तम लिचडे,सुजित नितनवरे,मानसिंह ठाकुर, विपीन वर्मा, अक्षय तिडके, ईशांत राऊत, योगेश शेंडे,राहुल तायडे, दत्ता बाबर, ज्ञानेश्वर गावंडे,मधुकर बर्वे, सुधीर सिंह राना, राजेश जिरापुरे, नंदा कदम, कल्पना सगदेव, ज्योती भोरकर रंजीता यादव, राजेश शेळके, दिवानजी रहांगडाले,पिंटु पटले, लक्ष्मीनारायण केसरवानी, रोहित तिवारी उपस्थित होते.

## काँग्रेस कमिटी तर्फे शिवजयंती साजरी



**वाडी:** काँग्रेस कमिटी तें आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आदर्शवाडी शिवाजी महाराज स्मारक येथे महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी कार्यकारी अध्यक्ष अश्विन बैस ,जिल्हा महासचिव दुर्योधन ढोणे, माजी जि.प. सभापती भारती पाटील,नागपूर तालुका अध्यक्ष प्रकाश कोकाटे,शैलेश थोराणे अध्यक्ष वाडी शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष शैलेश थोराणे,माजी उपनगराध्यक्ष राजेश थोराने ,शैलेश कडू,वाडी शहर महिला काँग्रेस अध्यक्ष अरुणा पगारे ,माजी सरपंच भीमराव लोखंडे,जिल्हा युवक काँग्रेस प्रवक्ता पंकज लके ,योगेश कुमकुमवार,अशोक गडलिंगे, निता मडावी, प्रमोद गिरीपुंजे, नितेश क्षीरसागर, विनोद गिरिपुंजे, ईशान जंगले, संतोष इखनकर,विनोद बांगरे,संदीप रायजादा,राजू राजपूत,आकाश साठवणे,तरुण टे उपस्थित होते.

## विश्व हिंदू शौर्य संघटने शिवजयंती साजरी केली



**वाडी :** हिंदवी स्वराज्य संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्त आदर्श नगर चौकातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील शिवाजी महाराज यांच्या सिंहासनारुढ पुतळ्याचे विश्व हिंदू शौर्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवम राजे यांनी विधिवत पूजन केले. संघटनेचे मार्गदर्शक विशाल जाधव,गौरव उगले,प्रज्वल अतकरी यांनी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण केले. कार्यक्रमाचे आयोजन वाडी शहर विश्व हिंदू शौर्य संघटनेर्ते करण्यात आले. यावेळी वैभव राजे, लोकेश जगताप,चंद्रकांत येवले, शुभम डवरे, पवन बरबईले, महेश चौधरी,विशाल जोध,रवी अजित,आर्यन नाविक,आदित्य नाविक, सनित दरवाई, प्रज्वल हेंबाडे,आकाश चिंचोळकर,गुलशन शेंडे उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस ने शिवजयंती साजरी केली

**वाडी:** हिंदवी स्वराज्य संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील शिवाजी महाराज यांच्या सिंहासनारुढ पुतळ्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( अजित पवार गट ) यांच्या वतीने महाराजांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करुन विधिवत पूजन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष संतोष नरवाडे, सुरेंद्र मोरे, शहर कार्याध्यक्ष अमित हसनापुरे,राजेंद्र पवार, शहर महासचिव,रवींद्र सुरजुसे, देवराव अखंड, श्रीराम सोनेकर, कमलेश विजयकर, आशिष गोरखेडे, प्रदीप नाईक, जगदीश लिचडे, विकी ठवरे, रोशन काकडे, ज्ञानेश्वर गावंडे, बंटी चोकांद्रे,शहराध्यक्ष अमित तायडे , सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष अतुल शेंडे,साजन पाटील, खुशाल विजयकर, प्रतीक शेंडे, अविनाश घोटेकर, विनय लांजेवार, शैलेश क्षीरसागर उपस्थित होते.

## हर हर महादेवच्या गर्जनेत शिव जयंती साजरी



**रामटेक :( प्रतिनिधी )** दामयंतीताई देशमुख बी.एड व डी. एड. कॉलेज, रामटेक येथील संस्थाध्यक्ष रविकांत रागीट तथा प्राचार्या जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १९ ब्रुवारी २०२५ रोज बुधवारला विद्यालयात मराठा सत्तेचे संस्थापक महाराष्ट्राचे आराध्य दैवत जाणता राजा शिवछत्रपती महाराज्यांच्या प्रतिमेचे राज्याभिषेक, माल्यार्पण,पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने महाराजांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता नेहमी असावी यासाठी महाराजांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बी.एड विभाग प्रमुख प्रा. उर्मिला नाईक, डी.एड विभाग प्रमुख प्रा. शालू वानखेडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. देवानंद नागदेवे, प्रा. सविता तायवाडे, नॅक समन्वयक प्रा. किरण शेंद्रे, प्रा. अनिल मिरासे, प्रा.मयुरी टेंभुर्णे, प्रा.कला मेश्राम, सतीश कळंबे, स्नेहा गाथे, संदीप ठाकरे, वर्षा माहुरकर, इत्यादिसह ब्याच संख्येत विद्यार्थी उपस्थीत होते.

## रामटेक येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**रामटेक :( प्रतिनिधी )** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त बस स्टॉप, रामटेक येथिल छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला राज्य मंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी माल्यार्पण करुन अभिवादन केले. यावेळी शिवसेना शहर प्रमुख राजेश किंमतकर, माजी सभापती न.प.रामटेक बिर्केद्र महाजन,पुरुषोत्तम मेश्राम,विश्वास पाटील, हिमांशु पानतावणे, युवासेना शहर प्रमुख सौरभ सिंगणजुडे,युवासेना रामटेक तालुका प्रमुख प्रुल वरखेडे, माजी न.प.उपाध्यक्ष सुनिल देवगडे,विनायक सावरकर, महेश बिसन,राधेश्याम साखरे,विलास तांदुळकर, संतोष साकोरे,राजेश नानोटे, दिनेश माकडे,हर्ष कनोजे, प्रणय सोनाथे,मेघा निरुडवार,खुशाल चकोले, आशिषु लबांदे, शुभम कुथे, खुशबू इनावाते, वर्षा गाढवे,शारदा इंदोरकर, दुर्गा बनसोड, सविता शेंडे, वैशाली कुलरकर,ऑटो सेनेचे विष्णु लोखंडे, सुनिल हत्तीठेले, विजय टिपले, सुरेश सोनवाणे, विजय गेडाम,रामटेक तालुका महिला आघाडी सह शिवसेना पदाधिकारी यांनी जय भवानी . जय शिवाजी असा जयघोष करीत छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना दिली.

## भाजप कडूण छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**रामटेक :( प्रतिनिधी )** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती भारतीय जनता पार्टीर्ते रामटेक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी रामटेक विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी,रामटेक पं.स. माजी सभापती नरेंद्र बंधाटे, भाजपा शहर अध्यक्ष उमेश पटले,भाजप नेते राजेश जयस्वाल, भाजपा शहर अध्यक्ष महिला आघाडी चित्रा धुरई, जिल्हा उपाध्यक्ष आलोक मानकर, हिवरा बाजार चे



सरपंच शितल जयस्वाल,करीम मालधारी सह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## भ्रष्टाचार विरोधी संघटने ने शिवाजी महाराज जयंती साजरी केली





**कामठी :** भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश महाराष्ट्र राज्य कामठी शाखेच्या वतीने चंद्रमनी नगर कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीवर कार्यक्रम घेण्यात आला . ज्येष्ठ सेवानिवृत्त अधिकारी मुमताज अली यांनी माहीती अधिकार कार्यकर्ता रमेश कुमार बाली यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या ोटोला माल्यार्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली . बहुजन प्रतिपालक , रयतेचा राजा , अठरा पगड जातीचा बहुजन राजा , सर्वप्रथम अंधश्रध्देवर मात करुन विज्ञान वादी दृष्टीकोणावर भर देणारा स्वराज्य प्रस्थापित करणारा जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वावर प्रकाश टाकणारे भाषण उपस्थितांनी केले . याप्रसंगी सर्वश्री नागपुर जिल्हा अध्यक्ष जेष्ठ नागरिक सुरेश अढाऊ , मनोहर खुरगे , हुसैन अली पत्रकार , झर अब्बास , बाल्या बोरीकर , कमर अब्बास , खुर्शीद टेलर , मुन्शीजी आदी प्रामुख्याने उपस्थित होते .

## वंचितने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी केली

महासागर तालुका प्रतिनिधी

**कामठी :**



वंचित बहुजन आघाडी कामठी शहर तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली असून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त वंचित बहुजन आघाडी कामठी शहर तें गोयल टॉकीज चौक कामठी येथे स्थापित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर प्रसंगी नरेश वाघमारे, वं.ब.आ. ना.जि.उपाध्यक्ष प्रशांत नगरकर , महासचिव ना.जि. दिपक वासनिक, अध्यक्ष वं.ब.आ. कामठी शहर, नितेश नागदेवे उपाध्यक्ष कामठी शहर, राजेश ढोके महासचिव,अजय मेश्राम सचिव, सुदेश श्यामकुवर ,अल्पेश वाल्दे युवा आघाडी,सनि मेश्राम, व ईतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळा नंदापूरी येथे शिवजयंती साजरी

**रामटेक :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्र नंदापूरी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन वृत्तांत



सांगितला. शिवशाहीची मराठमोळी वेशभूषा विद्यार्थ्यांनी केली होती.

यावेळी रामटेक येथील श्री.नरेंद्र तिडके महाविद्यालयाचे प्रा. कठाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मनोहरजी नागपुरे, श्रीमती विमलताई इंगोले, मुख्याध्यापक आनंद नंदनवार, अंगणवाडी सेविका बेबीताई पडोळे, मुक्ताताई मदनकर, अंबर नागपुरे व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त साहित्याची व पत्रांची प्रदर्शनी ला आमदार प्रवीणभाऊ दटके यांची भेट



**नागपूर:** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त हेरिटेज फाउंडेशन या संस्थेच्या योगदानातून आणि मराठा सेवा संघाचे वतीने शिवाजी महाराजांच्या काळातील आणि इतर काळखंडातील अत्यंत महत्त्वाच्या बहुमूल्य साहित्याची व पत्रांची प्रदर्शनी ला गुरुदेव सेवा मंडळ, आग्यारामदेवी चौक नागपूर येथे प्रदर्शनी लावण्यात आली होती.त्यानिमित्ताने आमदार प्रवीणभाऊ दटके यांनी भेट घेऊन माहिती जाणून घेतली व संपूर्ण प्रदर्शनी ची पाहणी केली.त्यामध्ये शिवकालीन पत्रव्यवहार नाणी , असे विविध साहित्याची सुद्धा स्टॉल लावण्यात आले होते.

## पीएमश्री नगरपरिषद माध्यमिक विद्यालय कळमेश्वर, येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती



**कळमेश्वर:** पीएमश्री नगरपरिषद माध्यमिक विद्यालय कळमेश्वर, येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली .छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच महाराष्ट्र गीत म्हणत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शाळेच्या विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर सुंदर असा पोवाडा सादर केला. तसेच विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रेरणादायी भाषण दिले. शाळेच्या स्काऊट अँड गाईड विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेच्या प्राचार्य श्रीमती पौर्णिमा मेश्राम या उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवना मधील नियोजन आणि सहकार्याची भावना आपल्याला यशाचा मार्ग कसा दाखवू शकते यावर मार्गदर्शन केले तर प्रमुख वक्ते अरविंद जी राठोड प्राध्यापक ज्युनिअर विभाग यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याचा जागर विद्यार्थ्यांसमोर केला. या जयंतीच्या पावन सोहळ्यावर उपप्राचार्य जांभरुणकर सर ,पर्यवेक्षक राठोड सर, तसेच विभाग प्रमुख लांजेवार , अलोने मॅडम मंचावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचा जांभूळकर सर यांनी केले ,तर संचलन सुरेखा धरपाल यांनी केले.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मनोज काळे यांनी केले . हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे शिक्षक उज्वला गमे, सिंग, पोळी, जाधव तसेच सर्व शिक्षक, कर्मचारी , स्काऊट व गाईडचे विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# संत गजानन महाराजांचे मला आलेले अनुभव प्रकट करत आहे

महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १९ : बघा गोष्ट आहे इस.वी सन २०१९ सालाची, मी गजानन फक्त देवराव प्रधान माझी खूप इच्छा होती की, माझ्या घरी गजानन महाराजांचे पावले यावं याकरिता मी खूप प्रयत्न केले. २०१७ मध्ये इच्छा झाली होती परंतु नाही आल्यात, त्यानंतर २०१८ मध्ये पादुकांकरिता मी माझे नाव नोंदविले परंतु याही वर्षी पादुका आल्या नाही. यापूर्वी माझ्या शेजारी प्रदीप गणोरकर परिवारांकडे २०१७ व २०१८ मध्ये गजानन महाराजांच्या पाऊल आले होते. त्याच वेळेस मी सुभेदार ले आउटचे पडोळे दादांकडे त्यांना नंबर दिलेला होता परंतु मला मेसेज आलेला नाही. मला काही कल्पना नव्हती. मला असं वाटत होतं माझ्याकडे पादुका येईल परंतु नाही आल्यात ! म्हणून आम्ही नवरा -बायकोने संकल्प केला आमच्या घरी गजानन महाराजांच्या पादुका आणायच्या असा ठाम निर्णय घेतला. पण कुठून ? आम्ही विचार करून निर्मल नगरी येथील गजानन मंदिरातील पादुका आणायचं ठरवलं.

परंतु माझे जिवलग मित्र निखिल भुते शिरसपेठ यांना मी विचारपूस केली ते माझ्याकडे आलेत त्यांनी मला मार्गदर्शन केलं आणि म्हटलं आपण निर्मल नगरीच्या पादुका नाही आणूया ? मग कुठून ? आणायच्या तर आपण काचुर्णा येथील वासुदेवराव विरखरे महाराजांच्या घरच्या पादुका आणायचं ठरविलं तर माझे मित्रांने मला चंद्रशेखर क्षेत्रपाल (दादा ) कडे घेऊन गेले. आणि माझा परिचय झाला. त्यांनी खूप मार्गदर्शन केलं ते परस्पर विरखरे दादांसोबत फोनवर बोलले. माझ्याकडे पादुका यावं याकरिता दोन महिने आधीपासून संपर्क साधून तारीख घेऊ असं ठरलं. त्यांनी सांगितलं की, आम्ही पुढच्या महिन्यात प्रताप नगरला चौधरी साहेबांकडे पादुका घेऊन येतोय. त्यावेळेस तुम्ही माझी प्रत्येक भेट घ्या मी माझ्या डायरीमध्ये तुमचं नाव नोट करतो आणि त्या तारखेला तुमच्याकडे पादुका येतील असं आमचं फोनवर बोलणं झालं . ठरल्याप्रमाणे मी चौधरी साहेबांकडे पादुका दर्शनाकरिता मी व माझी पत्नी देवदर्शना करिता गेलो व देवदर्शन भेटीगाठी झाल्यानंतर विरखरे महाराजांची भेट घेतली आणि सांगितलं मीच देवराव प्रधान पत्रकार ! माझ्या घरी पादुका दर्शनाकरिता येत्या ३ फेब्रुवारी २०१९ मध्ये रविवारी आणायचे आहेत. असं त्यांच्या डायरीत मध्ये नोट करून दर्शन घेऊन तारीख घेतली. चौधरी साहेबांकला महाप्रसाद घेऊन घरी परतलो. तारीख ठरली आणि कामाला लागलो. पुढे दोन महिन्यानंतर माझ्या घरी पादुका येणार होत्या. मंडळी बघा पुढे काय घडते ! मी महाराजांना नेहमी फोन करत होतो. मला आश्वासनच भेटलं ! हो -या तारखेला तुमच्याकडे पादुका येतील. त्यांनी माझ्याकडून खूप काही माहिती घेतली. तुमच्याकडे कार्यक्रम मोठा आहे. किती भक्त लोक येतात. मी त्यांना सांगितलं पाचशे -सातशे माणसाचा कार्यक्रम आहे. आणि माझ्या घरी दिवसभर पादुका हव्यात. हे सुद्धा मी प्रत्यक्ष बोललो. ते हो म्हणाले. माझ्या घरच्या पादुका तुमच्या घरी येतील हे आश्वासन



दिले. पण मी येणार नाही. अशी सुद्धा म्हणाले बरं ठीक आहे. महाराजांनची तारीख ठरली. ३ फेब्रुवारी २०१९ दिवस रविवार, नंतर पंधरा दिवसांनी फोन केला. जय गजानन दादा आठवण आहे ना ? माझ्या घरी पादुका पाहिजे आपण पण सोबत या ! हो , दादा मीतुमच्या घरी जरूर येतो तुमच्या घरचा मोठा कार्यक्रम आहे. पत्रकार लोक येतात, मोठमोठे लोक येणार असे म्हणून ते मला तुमच्या घरी नक्की येतो असं म्हणाले. मी खूप आनंदित होतो. माझ्या घरी गजानन महाराजां चे पावलं येते. मी सर्वांना, मित्रांना, पाहुण्यांना, नातेवाईकांना, गजानन भक्तांना, सर्वांना सांगितलं. माझ्या घरी पादुका येणार म्हणून मी पत्रिका छापल्या. मंडप डेकोरेशन जोरात तयार केली. गजानन महाराजांच्या भजनांची तयारी केली. आचारी सांगितले. एवढेच नाही तर पादुका आणण्या करिता गाडी सुद्धा किरायाने केली खूप काही खर्च केला. कार्यक्रम आठ दिवस राहिलेला आहे. मी त्यांना फोन केला दादा जय गजानन दादा मला पादुका घ्यायला केव्हा व कधी यायचं आहे ? हे फोनवर बोलत असताना मी त्यांना म्हटलं त्यांनी म्हटलं माझ्या माऊलीची म्हणजे पत्नीची तब्येत ठीक नाही. तुमच्याकडे पादुका येणार नाही ? मला एकदम धक्का बसला नंतर मी लगेच भक्तगणांना फोन करून मार्गदर्शन घेतलं. परत त्यांना फोन केला सर्व माहिती दिली हो म्हणाले हो तुमच्याकडे येईल. असं म्हटलं मी शांत अस्वस्थ झोपलो. एक दिवसाआधी फोन केला दादा माझ्या घरी पादुका पाहिजे ? हो. येईल असं म्हटलं. मला या व्यक्तीला तुम्ही गाडीमध्ये घेऊन या तुम्हाला मी पादुका देतो असं म्हटलं. परंतु शनिवारी २ फरवरी २०१९ ला रात्री ७:३० वाजता. माझ्या घरी गजानन महाराजांच्या मूर्तीची स्थापना झाली. आरती झाली. सर्व झालं आम्ही सगळेजण बसलो. नातेवाईक शेजारी भजनकरी मंडळी आमच्या घरी होती. लगेच रात्रीच्या ८ वाजता फोन आला मध्यस्थी व्यक्तींचा त्यांचं नाव घोटकर दादा मनीष नगर तुमच्या घरी पादुका येणार नाही. असं महाराजांनी म्हटलं मला पुन्हा धक्का बसला. मी त्यांच्याशी बोलत राहिलो त्या व्यक्तीने मला सांगितलं मी तुम्हाला ओळखत नाही. माझा तुमचा काही संबंध नाही.

मला महाराजांनी म्हटलं तेव्हा मी सांगितले. असं म्हणून त्यांनी फोन बंद केला. मग मी थोड्यावेळाने गंभीरतेने घेऊन परत पुन्हा फोन केला पण त्यांनी फोन उचलला नाही. मग काय करावं ? मला सूचेनासे झाले मला रडू यायला लागले मग मी चंद्रशेखर दादा क्षेत्रपाल यांना फोन केला त्यांना पूर्णपणे आपबिती सांगितली. हे माझ्या घरी रात्रीच्या अकरा वाजता आले. त्यांच्या सहपरिवार सोबत आलेत. त्यांना आपबिती सांगितली. त्यांनी म्हटलं चला आपण सविस्तर बोलू एकदा ! फोन लावा मग आपण बोलू तर पुन्हा महाराजांच्या फोनवर फोन केला त्यांची मुलगी कल्पनाताई चौधरी फोनवर बोलल्या दादा तुमच्या घरी पादुका येणार नाही माझ्या आईला खाली टाकला आहे. म्हणजे माऊली ला खाली टाकले आहे डॉक्टरांची लाईन लागली मी माझ्या दुःखात आहे मी तुमच्या सोबत बोलणार नाही तुमच्या घरी पादुका येणार नाही.

असे त्यांनी सांगितले. पण मी त्यांना सांगितलं मी आता गाडी पाठवत आहे. तुम्ही मला पादुका द्या ! मी पादुका घेऊन येतो त्यानंतर मी आपला कार्यक्रम करतो. असे मी त्यांना म्हणालो परंतु त्या ऐकायला तयार नव्हत्या आणि फोन बंद करून दिला तर दादांनी परत फोन लावण्यास सांगितला , मी पुन्हा फोन लावला फोनवर कल्पनाताई चौधरी यांनी सांगितले आईला खाली टाकलं आम्ही तुमच्या सोबत बोलू शकत नाही आणि तुमच्या घरी पादुका येणार नाही त्यावर मी बोललो आम्ही म्हणालो ताई जय गजानन माऊली माऊलीला काही होणार नाही परंतु त्या ऐकाला तयार नव्हत्या तर माझा तिसरा डोळा उघडला आणि म्हटलं ताई मी एक पत्रकार आहे. विचार करा की माझी कल्पनापूर्ण होणार नाही माझा संकल्प साध्य होणार नाही मला पण विरखरे महाराजांनी शब्द दिला.

मी दोन महिन्यापासून प्रयत्न केला परंतु तुमच्या पादुका माझ्या घरी येणार नाही मी काय करू ? जर सगळ्यांना माहिती झालं तर माझं काय होईल ? माझ्या कार्यक्रमाचे काय होईल ? मी फक्त लोकांना सांगितलं नातेवाईक आले त्यांना काय उत्तर देऊ ? म्हणून मी त्यांना उत्तर दिलं उद्या जर लग्न असलं तर लग्नाच्या आधी पोरगी पळून गेली तर माझं काय होईल हा प्रश्न मी तिला केला तिने त्यावर काही उत्तर दिलं नाही मग माझ्या मनात विचार आला की मी पत्रकार नात्याने तुमच्या सोबत बोलत आहे ह्या पादुका वैयक्तिक नाही आहे.

# जय छत्रपती शिवाजी महाराज, जय भारत पदयात्रेचे प्रशासनाकडून दिमाखदार आयोजन

## आखाडे, लेझिम, ढोलताशा पथक, आदिवासी नृत्य अनेक झाकींमधून महाराजांना वंदन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

सक्करदरा येथे राजे रघुजी भोसले यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करुन पदयात्रेला सुरुवात झाली. तर महाल येथील गांधी गेट स्थित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांनी अभिवादन केले व पदयात्रेची सांगता झाली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जनतेला संबोधित केले.

छत्रपती शिवाजी महाराजांची महती देशभर पोहोचावी आणि विकसीत भारताची संकल्पना अधिक मजबूत याकरिता मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जय छत्रपती शिवाजी महाराज जय भारत पदयात्रा उपक्रमाची रचना केली. आज देशभर हा कार्यक्रम साजरा होत असल्याबाबत बावनकुळे यांनी आनंद व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज हे उत्कृष्ट शासक, प्रशासक होते. जनतेच्या हिताचाच सदैव विचार मनात बाळगून कार्य करणाऱ्या जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा अंगीकृत करुन महाराष्ट्र आणखी प्रगतीपथावर जाईल, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला. मुघलशाहीचे पतन आणि हिंदवी स्वराज्याची बळकटी साधणारा हा सुवर्णक्षण ठरला. महाराजांची ही वाघनखं महाराष्ट्र शासनाने लंडनहून परत आणली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने महाराजांची ही ऐतिहासिक वाघनखं नागपूर शहरातील मध्यवर्ती संग्रहालयामध्ये ठेवण्यात आलेली आहेत. या वाघनखांचे नागरिकांनी दर्शन घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

मनपाचे अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांनी स्वतः रेखाटलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र बावनकुळे यांना भेट दिले. कार्यक्रमाचे संचालन मनपा जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी व हंबीरराव मोहिते यांनी केले. आभार क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर यांनी मानले.



### शिवकालीन कलांचे नेत्रदिपक सादरीकरण

गांधीगेट येथील कार्यक्रमात अमोल खंते यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा साकारुन उपस्थिती दर्शविली. शहरातून काढण्यात आलेल्या पदयात्रेमध्ये ठिकठिकाणी चिमुकल्यांनी शिवकालीन कलांचे सादरीकरण केले. या सादरीकरणाला बावनकुळे यांनी टाळ्या वाजवून दाद दिली आणि चिमुकल्यांना प्रोत्साहित केले. राजे रघुजी भोसले स्मारक सक्करदरा येथे संजूबा हायस्कूलचा विद्यार्थी अजित मोहिते याने शिवाजी महाराजांवर उत्कृष्ट पोवाडा सादर केला. पदयात्रेला सुरुवात होण्यापूर्वी या ठिकाणी डॉ. संभाजी भोसले ग्रुप आणि शिवशक्ती आखाडाच्या विद्यार्थ्यांनी आखाडा प्रात्यक्षिके सादर केली. सी.बी. अँड बेरार चौक येथे जिम्नॅस्टिक असोसिएशन नागपूरच्या विद्यार्थ्यांनी जिम्नॅस्टिकचे प्रात्यक्षिक सादर केले.

### पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

चिमुकले स्केटर्स, उंट व घोडे पथक, राजदरबार पोवाडा पथक, आदिवासी नृत्य, आखाडा, छत्रपती शिवाजी महाराजांचा रथ, लेझीम पथक, शिवमुद्रा ढोलताशा पथक यांनी पदयात्रेमध्ये आपल्या कलांचे सादरीकरण केले.

पदयात्रेमध्ये मनपाद्वारे रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पदयात्रेच्या राजे रघुजी भोसले स्मारक सक्करदरा, गजानन चौक जुनी शुक्रवारी, केशव द्वार चौक, रेशीमबाग चौक, सी. पी. अँड बेरार चौक, कोतवाली चौक ते गांधी गेट चौक या संपूर्ण मार्गावर विविध ठिकाणी पिण्याचे पाणी तसेच विद्यार्थ्यांसाठी खाऊची व्यवस्था देखील करण्यात आली होती.

पदयात्रेमध्ये मनपाचे अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, सहायक आयुक्त अशोक गराटे, घनश्याम पंधरे, विकास रायबोले, प्रमोद वानखेडे, नरेंद्र बावनकर, विजय थुल, धनंजय जाधव, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, साथरोग अधिकारी डॉ. गोवर्धन नवखरे, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंधाडे, सुनील उईके, सचिन माटे, अनिल गेडाम आदी उपस्थित होते.

### शाळा, महाविद्यालयांचा सहभाग

पदयात्रेमध्ये मनपा अग्निशमन पथक, मनपा संजयनगर हिंदी माध्यमिक शाळा, केशवनगर माध्यमिक विद्यालय आणि कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, कमला नेहरू महाविद्यालयातील, डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, मनोहरराव कामडी महाविद्यालय, गोविंदराव वंजारी महाविद्यालय, प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, श्री गजानन विद्यालय नवीन सुभेदार, बाबानानक सिंधी हिंदी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, शासकीय दाभा वसतीगृह या शाळेतील विद्यार्थ्यांसह मनपाचे हिवताप व हत्तीरोग विभागाच्या कर्मचारी, मनपा ज्येष्ठ नागरिक मंडळ तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सुमारे १५ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी देखील पदयात्रेमध्ये सहभाग घेतला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी माँ साहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, मावळे अशा वेगवेगळ्या वेशभूषा परिधान केली होती. नागपूर महानगरपालिकेच्या वतीने रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली होती तसेच महाल परिसरातील दादीबाई देशमुख मुलींची शाळा येथे रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती : भाजपातर्फे अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

नागपूर. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्ता ?ड. धर्मपाल मेश्राम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी सेतराम सेलोकर , सुरेश बारई, महेंद्र कठाणे, कांता रारोकर, प्रमोदजी पेंडके, सचिन चंदनखेडे, प्रवीण कांबळे, निरंजन दहिवाले, राकेश मेश्राम, रवीभाऊ चवरे, गिरीश पिल्ले, मच्छिन्द्र सिल्वरू, आशाताई बोरकर,अतुल तिरपुडे, आशिष बाजपेई, राहुल उके, देवचंद मार्कंडेय,लंकेश चांदेकर, कामेश अंबादे, सुनील आगरे, दिपक ठाकूर, राजेश राऊत, अविनाश ठोसर, बबलु चिकटे, अशोक देशमुख, गजानन अंतुरकर, धनंजय चवरे, राहुल महात्मे, मयूर टिचकुले, रवि जोगे, शीतल पटीये, नंदु मोरस्कर,नारायण आकरे ,शारदा बारई, रश्मी कुंभरे, संगीता उरकुडे यांच्यासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

## पालकमंत्र्यांच्या घरासमोर ऑटोचालकांना लुटले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

भाजपा प्रदेशाध्यक्ष तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कोराडीतील निवासस्थानाजवळ दोन गुंडांनी दोन ऑटोचालकांना मारहाण करीत त्यांच्या खिशातील रक्कम काढून पळ काढला.

गुन्हे शाखा पोलिसांनी दोनपैकी एका आरोपीला अटक केली. असलम खान अयूब खान (२९), रा. इंद्रप्रगतीनगर, कोराडी असे या आरोपीचे नाव आहे. बाजार चौक, सावनेर येथील रहिवासी अमित तांडेकर (२४) ऑटो चालक आहे. तो महादुलाजवळ, बावनकुळे यांच्या घरासमोर त्यांचा प्रवाशी ऑटो घेऊन प्रवाशांची वाट बघत होता.

पालकमंत्र्यांच्या घराजवळील परिसरात पोलिसांचा मोठा ताफा असतो. अमित तांडेकर व त्याच्या ओळखीचा ऑटोचालक मुसा ऑटो घेऊन प्रवाशांची वाट बघत होते. काही वेळाने येथे आरोपी असलम खान आणि त्याचा एक साथीदार मद्दाक (२७) हे दोघे दुचाकीने अमित तांडेकर याच्याजवळ आले आणि पैसे मागितले. परंतु, अमित याने त्यांना पैसे देण्यास नकार दिला.

तू आम्हाला ओळखत नाही का? आम्ही या भागातील दादा आहोत. येथे धंदा करायचा असल्यास दर महिन्याला पैसे द्यावे लागतील, असा दम दिला. तरीही अमितने पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर आरोपी असलम आणि मद्दाक यांनी अमितला मारहाण करत त्याच्या खिश्यातून एकूण ७०० रुपये जबरी हिसकावले आणि पळून गेले.

तक्रारीवरून कोराडी पोलिसांनी आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल केला. तपासात गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ५ च्या पथकाने आरोपी असलम खान याची माहिती गोळा केली आणि शोध घेत त्याला ताब्यात घेतले. अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेत एक मोठा लोखंडी चाकू आढळून आला. त्याला पोलिसांनी ठाण्यात आणले. त्याची विचारपूस केली असता त्याने उपरोक्त ऑटोचालकाला लुटल्याची कबुली दिली.
















■ **नागपूर :** महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्यावतिने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जय छत्रपती शिवाजी महाराज... जय भारत या पदयात्रेचे शहरात आयोजन करण्यात आले होते.

१. पदयात्रेत विविध शाळांचे विद्यार्थी मावळ्यांच्या वेशभुषेत सहभागी झाले होते.
२. शाळकरी मुलींनी दांडपट्ट्याचे प्रात्याक्षिक सादर केले.
३. एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती आणि मावळ्यांची भूमिका साकारली.
४. पदयात्रेत मुलींनी लेझिमच्या तालावर ठेका धरला होता.
५. चक्क घोड्यावर स्वार होत या मुलींनी पदयोत्रत लक्ष वेधून घेतले.

## अविवाहित असल्याचे सांगून शोषण
# रेल्वे अधिकाऱ्यावर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

अविवाहित असल्याचे सांगून रेल्वे अधिकाऱ्याने एका महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केला. विवाहित असल्याचे सत्य उघडकीस येताच महिलेने पोलिसांत लेखी तक्रार केली. याप्रकरणी पोलिसांनी तक्रारीवरुन रेल्वे अधिकाऱ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. शैलेंद्र कुमार (४३, खैरी, कामठी) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शैलेंद्र कुमार हा रेल्वे विभागात अधिकारी आहे. त्याची ऑगस्ट २०२१ मध्ये दत्तवाडीत राहणाऱ्या ३८ वर्षीय महिलेशी ओळखी झाली. त्याने महिलेचा मोबाईल क्रमांक घेतला. त्याने तिला मदत करण्याचे आमिष दाखवून मैत्री केली.

शैलेंद्रने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला अविवाहित असल्याचे सांगितले. तसेच तिला लग्न करण्याचे आमिष दाखवले. त्यामुळे त्या महिलेने त्याच्यावर विश्वास ठेवून लग्नास होकार दिला. तो महिलेच्या घरी जायला लागला. तिला शारीरिक संबंधाची मागणी करायला लागला.

मात्र, महिलेने त्याला वारंवार नकार दिला. त्यामुळे त्याने महिन्याभरात लग्न करण्याचे आमिष महिलेला दाखवले. महिला त्याच्या आमिषावर भाळली. गेल्या ऑगस्ट २०२१ पासून शैलेंद्र हा महिलेवर लैंगिक अत्याचार करायला लागला. शैलेंद्र तिला बाहेरगावी नेऊन शारीरिक शोषण करीत होता.

### असा झाला उलगडा

शैलेंद्र कुमार हा रेल्वेत अधिकारी असल्यामुळे तो नेहमी ड्युटीवर जात असल्याचे सांगून आपल्या कुटुंबियांना भेटायला जात होता. त्यामुळे महिलेला संशय आला. तिने शैलेंद्रवर पाळत ठेवली. तो महिलेच्या घरी आला. रात्रभर थांबल्यानंतर ड्युटीवर जात असल्याचे सांगून दुसऱ्या दिवशी निघून गेला. मात्र, महिलेने त्याचा पाठलाग केला. तो थेट खैरी येथील स्वतःच्या घरी गेला. तेथे तो पत्नी व दोन मुलांसह राहत होता. ती महिला तेथून घराकडे परतली.

### लग्नास नकार, बलात्काराचा गुन्हा

महिलेने शैलेंद्र कुमारला लग्न करण्याचा तगादा लावला. मात्र, तो वेळ मारुन नेत होता. शैलेंद्रच्या पत्नी व मुलांचे फोटो महिलेने त्याला दाखवले. त्यामुळे तो घाबरला. लग्न न केल्यास बलात्काराची तक्रार करण्याची धमकी दिली. त्यामुळे शैलेंद्रने तिला लग्नाचे आमिष दाखवून काही दिवस थांबण्यास सांगितले.

१५ फेब्रुवारी २०२५ रोजी तो महिलेच्या घरी आला. त्यावेळी महिलेने त्याला पत्नीला घटस्फोट देऊन लग्न करण्याची गळ घातली. मात्र, शैलेंद्रने तिला नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या महिलेने नवीन कामठी पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरुन शैलेंद्र कुमार याच्याविरुद्ध

## एमपीएससी अभ्यासक्रम बदल, नवीन परीक्षा पद्धत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

एमपीएससीने जून २०२२ मध्ये राज्यसेवा परीक्षेची पद्धत व अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी २०२३ पासून होणार होती. मात्र, आयोगाने किमान तीन वर्षांचा वेळ द्यावा, अशी मागणी करण्यात आली होती. परीक्षेतील नवा बदल हा २०२५ पासून लागू करावा, या मागणीसाठी राज्यातील प्रमुख शहरांत विद्यार्थ्यांनी आंदोलने केली.

परिणामी, एमपीएससीने राज्यसेवा परीक्षेचे वर्णनात्मक स्वरूप २०२५ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, परीक्षेची नवीन पद्धत, नवीन अभ्यासक्रम नेमका कधी लागू होणार? यासंदर्भात आता महत्वपूर्ण माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे.

सुधारित पद्धतीत वर्णनात्मक स्वरूपाच्या नऊ प्रश्नपत्रिका असतील. त्यापैकी मराठी आणि इंग्रजी भाषेच्या प्रश्नपत्रिका प्रत्येकी ३०० गुणांच्या असतील. मराठी किंवा इंग्रजी निबंधाची एक, सामान्य अध्ययनाच्या एकूण चार, वैकल्पिक विषयांच्या दोन अशा एकूण सात प्रश्नपत्रिका प्रत्येकी २५० गुणांसाठी असतील.

कालानुरूप बदल करून परीक्षा आणि अभ्यासक्रमाची रचना नव्याने करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाधिक गुणवत्ताधारक उमेदवार मिळण्यास मदत होईल. तसेच सुधारित रचनेमुळे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यातील उमेदवारांचा टक्का वाढण्यास मदत होईल.

# उष्मा कमी करण्यासाठी महापालिका शिंपडणार रस्त्यांवर पाणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

शहरातील सर्व प्रमुख रस्ते सिमेंटचे झाले आहेत. वस्त्यांमधील रस्तेही सिमेंटचे होत आहेत. त्यामुळे दरवर्षी शहराचे तापमान उन्हाळ्यात साधारणतः ४० ते ४५ डिग्री सेल्सिअस असते. त्यावर उपाय म्हणून महापालिकेने उपाययोजना केली आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने सिमेंट रस्त्यावर पाणी शिंपडण्यात येणार आहे. परंतु, तज्ज्ञांनी याला अजब उपाय संबोधले आहे. तापलेल्या सिमेंट रस्त्यावर पाणी शिंपडले तर पाण्याचे बाष्पीभवन होऊन उकाडा अधिक वाढेल, असे त्यांचे म्हणणे आहे.

शहराचे तापमान उन्हाळ्याच्या दिवसात ४५ डिग्री सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिकही असते. या काळात घरोघरी कुलर वापरले जातात. त्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण होते. तसेच वीज




भारनियमन करण्याची वेळ येते. आता महापालिकेने सिमेंट रस्त्यावर पाणी टाकून उष्मा करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे रस्ता दुभाजावरील झाडांना, उद्यानातील झाडांना आणि रस्त्यावर टाकण्यासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. अशाप्रकारे पाणी रस्त्यावर ओतण्याची कल्पना महापालिका प्रशासनाला सुचते कशी, असा प्रश्न तज्ज्ञांनी केला आहे.

वाढता उष्मा आणि त्यामुळे उद्भवणारे आजार यावर उपाय म्हणून महापालिकेतर्फे दरवर्षी उन्हाळ्यात विविध उपायायोजना केल्या जातात. या नियोजनासंदर्भात अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी उष्माघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमाची आढावा बैठक घेतली. त्यात हा निर्णय घेण्यात आला.

### वर्दळीच्या ठिकाणी पिण्याचे पाणी

महापालिकेतर्फे उष्माघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमाची शहरात दरवर्षी अंमलबजावणी केली जाते. बैठकीत अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांना सादरीकरणाद्वारे नोडल वैद्यकीय अधिकारी (साथरोग) डॉ. गोवर्धन नवखरे यांनी माहिती दिली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी बस डेपो, पेट्रोल पंप, बाजारपेठ, वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी याकरिता टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा तसेच मार्केट असोसिएशनशी चर्चा करून बाजारपेठ व वर्दळीच्या ठिकाणी जागा निश्चित करावी असेही निर्देश त्यांनी दिले.

शहरातील सर्व उद्याने दुपारी १२ ते ४ वाजतापर्यंत सुरु ठेवावेत, टँकरच्या माध्यमातून रस्त्यावर पाण्याची फवारणी करावी, महत्वाच्या चौकात ग्रीन नेट लावण्यात यावी, विविध बांधकाम ठिकाणी कामगारांना पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी याकरिता कंत्राटदारांना संपर्क साधावा, रस्त्यावरील प्राण्यांकरिता आणि पक्षांकरिता महापालिकेच्या विविध इमारती, शाळा या ठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे, उद्यानांमध्येही पक्ष्यांकरिता पाणी उपलब्ध होईल अशी सुविधा तयार करावी तसेच रस्त्यावरील प्राण्यांकरिता शेल्टर होम तयार करण्यात यावे, त्यात योग्य वेटिंलेशनची दक्षता घ्यावी, आवश्यकता पडल्यास सामाजिक संघटनांची मदत घ्यावी असेही निर्देश अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी यावेळी दिले.

महापालिकेच्या विविध इमारतींमध्ये मिस्टिंग कूलिंग लावण्याच्या दृष्टीने देखील त्यांनी सूचना केली.